# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः15.03.2024** **वारःशुक्रवार**

---

1. ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू देशाचे नवे निवडणूक आयुक्त
2. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रती लीटर दोन रुपयांची कपात
3. वर्ध्याच्या सिंदी रेल्वे इथल्या ड्रायपोर्टचं केंद्रीय मंत्री नीतीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन
4. सायबर गुन्हे रोखण्यासाठी देशातली सर्वात प्रभावी यंत्रणा महाराष्ट्रात तयार होत आहे-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि
5. 14 व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**<u>नियुक्ती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी माजी सनदी अधिकारी ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू यांची देशाचे नवे निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक केली आहे. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्रालयानं यासंदर्भात आदेश जारी केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेतले काँग्रेसचे गटनेते अधीर रंजन चौधरी यांचा समावेश असलेल्या समितीनं या दोघांच्या नावांची शिफारस राष्ट्रपतींना केली होती. अरुण गोयल यांनी राजीनामा दिल्यानं तसंच अनुपचंद्र पांडे यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानं ही पदं रिक्त होती.

**<u>आयोग</u>**

निवडणूक आयोगानं निवडणूक रोख्यांची माहिती त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्टेट बँकेनं आयोगाला ही माहिती दिली होती.

**<u>एक देश एक निवडणूक</u>**

एक देश एक निवडणूक या विषयावर अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारनं स्थापन केलेल्या समितीनं आपला अहवाल काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सुपूर्द केला. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील या समितीनं तयार केलेला हा अहवाल 18 हजार 626 पानांचा आहे. गृहमंत्री अमित शहा, कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यावेळी उपस्थित होते. देशात सर्व निवडणुका एकाच वेळी घेण्याची प्रक्रिया दोन टप्प्यांत राबवण्याची शिफारस या समितीनं केली आहे. पहिल्या टप्प्यात संपूर्ण देशात एकाच वेळी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका घेतल्या जाव्यात. आणि दुसऱ्या टप्प्यात नगरपालिका, नगर परिषदा, महानगरपालिका, पंचायत समित्यांच्या निवडणुका घेतल्या जाव्यात. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांनंतर 100 दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्याव्यात अशी शिफारस या समितीनं केली आहे.

**<u>दर कपात</u>**

तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात देशभरात प्रतिलिटर 2 रुपयांनी कपात केली आहे. नवे दर आज सकाळी 6 पासून लागू झाले आहेत. त्यामुळे मुंबईत आता पेट्रोल 104 रुपये 21 पैसे तर डिझेलची किंमत 92 रुपये 15 पैसे असेल.

**सर्वोच्च न्यायालय**

ज्येष्ठ नेते शरद पवार यांचं नाव आणि फोटो वापरू नये, आणि या संदर्भात हमीपत्र लिहून द्यावं असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं काल राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला दिले. तसंच घड्याळ चिन्हाऐवजी दुसरं चिन्ह वापरण्याच्या पर्यायावर विचार करण्याचा सल्लाही न्यायालयानं दिला आहे.

**गडकरी**

नागपूर हे देशाच्या केंद्रस्थानी असून, मल्टीमॉडेल लॉजिस्टिक पार्क आणि सिंदी रेल्वे ड्राय पोर्ट अशा प्रकल्पाच्या माध्यमातून, देशाची लॉजिस्टिक राजधानी होण्याची क्षमता नागपुरात आहे, असं प्रतिपादन, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. वर्ध्याच्या, सिंदी रेल्वे इथल्या ड्रायपोर्ट आणि मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्क इथं रेल्वे टर्मिनल सेवांच्या संचालन परीक्षणाचा प्रारंभ, काल गडकरी यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. ड्रायपोर्टच्या माध्यमातून विदर्भातील कापूस, कापड, संत्र, हे कोलकत्त्याच्या हल्दिया मार्गे बांग्लादेशच्या नदीतून थेट बांग्लादेशला जातील. यामुळे प्रति कंटेनर दीड लाख रुपये असलेला वाहतूक खर्च हा एक लाख रुपयांवर येईल आणि विदर्भातील शेतकऱ्यांना याचा फायदा होईल. तसंच या भागात उद्योगाला चालना मिळून रोजगार निर्मिती होईल असं गडकरी म्हणाले.

**उपमुख्यमंत्री-रत्नागिरी**

सायबर गुन्हे रोखण्यासाठी देशातली सर्वात प्रभावी यंत्रणा तयार करण्याचं काम महाराष्ट्रात सुरू असून, लवकरात लवकर न्याय मिळण्यासाठी न्यायवैद्यक क्षमता वाढवण्यात येत आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल रत्नागिरीत केलं. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचं आणि पोलीस वसाहतीच्या नवीन इमारतीचं भूमिपूजन काल फडणवीस यांच्या हस्ते झालं; तयावेळी ते बोलत होते. दिवसाचे 24 तास जनतेच्या सेवेत असलेल्या पोलिसांची निवासस्थानं चांगली असावीत, यासाठी नवीन वसाहती उभारल्या जात असल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच, पोलिसांना निवृत्तीनंतर स्वतःचं घर घेता यावं, यासाठी अनुदानावर कर्जाची योजनाही पुन्हा सुरू केल्याचं फडणवीस म्हणाले. स्वातंत्र्यवीर सावरकरांना ज्या कोठडीत ठेवलं होतं, त्या कोठडीच्या सुशोभीकरणाचा प्रारंभही फडणवीस यांच्या हस्ते झाला.

**नवमतदार-मुंबई**

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवमतदारांमध्ये मतदानविषयक जनजागृती करण्यासाठी आणि त्यांना मतदानाचं महत्त्व पटवून देण्यासाठी माझं पहिलं मत देशासाठी हे देशव्यापी अभियान राबवण्यात येत आहे. दिग्दर्शक आणि अभिनेता सुबोध भावे यांनीही नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे...

**जल जीवन मिशन-परभणी**

केंद्र सरकारनं 2024 पर्यंत देशातल्या सर्व ग्रामीण कुटुंबांना नळ जोडणीद्वारे पुरेसं आणि सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी जल जीवन मिशन सुरू केलं. परभणी जिल्ह्यात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. पाळोदीचे उपसरपंच तोफिक पठाण यांनी या योजनेविषयी समाधान व्यक्त केलं आहे..

**राहुल गांधी-नाशिक**

देशातल्या बड्या उद्योगपतींचं 16 लाख कोटी रुपयांचं कर्ज माफ केलं जातं मग शेतकऱ्यांचं कर्ज माफ का होऊ शकत नाही, असा प्रश्न करत, केंद्रात इंडिया आघाडीची सत्ता आल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यात येईल, असं आश्वासन काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांनी दिलं. भारत जोडो न्याय यात्रेनिमित्त नाशिक जिल्ह्यातील चांदवड इथं आयोजित सभेत ते काल बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, माजी केंद्रीय मंत्री

जयराम रमेश उपस्थित होते. निर्यातबंदी आणि अन्य समस्यांमुळे शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागत आहेत, अशी टीका शरद पवार यांनी यावेळी केली. दरम्यान, राहुल गांधी यांनी पिंपळगाव बसवंत, ओझर आणि नाशिक मध्ये रोड शो केला. त्यानंतर त्र्यंबकेश्वरला जाऊन त्यांनी दर्शन घेतलं.

**जुन्नर संग्रहालय**

सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीचा सातवाहनकालिन वारसा लाभलेल्या जुन्नर शहरात जुन्या वस्तूंचं जतन संवर्धन व्हावं यासाठी जुन्या शासकीय रूग्णालयाच्या ब्रिटिशकालीन इमारतींमध्ये उभारण्यात आलेल्या संग्रहालयाचं लोकार्पण काल करण्यात आलं. सह्याद्री गिरिभ्रमण संस्थेच्या अनेक वर्षांच्या मागणीनंतर पुण्यातील डेक्कन कॉलेजच्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान -रूसा अंतर्गत एक कोटी रुपयांच्या निधीतून आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापाठीच्या सहकार्याने हे संग्रहालय साकारण्यात आले आहे. संशोधन आणि उत्खननात सापडलेल्या प्राचीन वस्तूंबरोबरच नागरिकांनी दान केलेल्या ऐतिहासिक वस्तूंचे माहितीपूर्ण दालन संग्रहालयात उभारण्यात आले आहे.

**दानवे-जालना**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी अभियानांतर्गत जालना शहरातल्या छत्रपती संभाजी उद्यानात उभारण्यात आलेल्या दीडशे फूट उंचीच्या राष्ट्रीय ध्वजाचं लोकार्पण काल केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते झालं. तत्पूर्वी शहरातून काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीत शालेय विद्यार्थी, पोलीस आणि महापालिकेचे कर्मचारी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**हॉकी**

पिंपरीतल्या मेजर ध्यानचंद हॉकी मैदानावर सुरू असलेल्या 14व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत घरच्याच मैदानावर खेळणाऱ्या महाराष्ट्र हॉकी संघाचा आत्मविश्वास उंचावला असून काल त्यांनी बलाढ्य दिल्ली संघावर 3-0 असा दणदणीत विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. आंतरराष्ट्रीय हॉकीपटू ऋतुजा पिसाळ तसेच काजल अडपतकर आणि प्रियांका वानखेडे या विजयाच्या शिल्पकार ठरल्या. गतविजेत्या मध्य प्रदेश संघाने सलग विजय नोंदवत उपांत्यपूर्व फेरीतील आपले स्थान पक्के केले. याशिवाय झारखंड, बंगाल आणि मणिपूर या संघांनीही काल विजय नोंदवले.

**रणजी**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात काल मुंबई संघानं विदर्भ संघाचा 169 धावांनी पराभव करत रणजीमधला 42 वा विजय नोंदवला. मुंबईच्या दुसऱ्या डावातल्या 538 धावांच्या प्रत्युत्तरात, विदर्भानं कडवी झुंज दिली; मात्र त्यांना 368 धावा करता आल्या. दुसऱ्या डावात शानदार शतक झळकावणारा मुंबईचा मुशीर खान सामनावीर ठरला असून, संपूर्ण स्पर्धेत उत्तम कामगिरी करणारा तनुष कोटियन मालिकावीर ठरला आहे.

**हवामान**

विदर्भात बहुतांश ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत वाढ झाली आहे मात्र राज्याच्या उर्वरित भागात कमाल तापमान जवळपास होतं. येत्या 24 तासात राज्यात हवामान कोरडं राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.